
Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month




# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५८ वे, अंक ११वा, मुंबई । जानेवारी २०२६
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 58, Issue : 11, Mumbai I January 2026
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50



## तिळगूळ घ्या, गोड बोला...



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार

वर्ष ५८वे, अंक ११वा,
जानेवारी २०२६
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**

**भ्रमणध्वनी :**
८४१९९०१०८७, ८४१९९०१०८८
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in

## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था डोंबिवली स्नेहसंमेलन














Hurda party
at
MF
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
First Time in Hyderabad Where You
Can Roast & Eat HURDA Directly at Farm
From 15 Nov 2025 to 15 Feb 2026
Morning 10:00 to Evening 05:00
One Day Advance Pre - Booking is Mandatory
Call: 70137 78442 | 9392495268
Lunch | Hi-Tea | Farm Visit | Bullock cart Ride | Tractor Ride
Play Area for Children | Toy Train | Swings and Many More, Pluck your own
Vegetables live with our farmers help all in one visit at MELGIRI FARMS.
Farms: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms

# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

अद्यावत नूतनीकरण केलेली

सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादा – माहीम विभागातील

## खालील मंगल कार्यालये

– तळमजल्यावरील कै. राधाबाई कब्बूर वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह

– दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह.

## * वैशिष्ट्ये *

वधू–वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन

मंगल कार्य ठरतात प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून

कार्यालय राखून ठेवा.

सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद,

नाट्य–तालीम,

संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध

****

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई – ४०० ०१६.

दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadram@gmail.com

# साधक चिंतन

**स.भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

साधनेची बैठक किती असावी? साधनेची 'बैठक' किती असावी हा मुद्दा प्रत्येक साधकाच्या मनाचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असतो. साधना म्हणजे केवळ वेळ घालवणे नाही; ती शरीर, मन आणि प्राण यांना एकाच लयीमध्ये आणणारी दिव्य प्रक्रिया आहे. त्यामुळे बैठक किती घ्यावी, किती वेळ बसावे, किती काळ जप किंवा ध्यान करावे-हे सर्व प्रश्न स्वाभाविकपणे उद्भवतात. साधनेच्या सुरुवातीच्या टप्प्यात शरीराला जितकी साथ देता येईल तितक्या मर्यादेत साधकाने मनापासून, पण नेटाने साधना करावी. समर्थांनी केलेले पुरुषार्थ, अनेक संतांचे कठोर पुरश्चरण हे प्रेरणादायी आहे; परंतु प्रत्येकाच्या जीवनस्थिती भिन्न असतात. म्हणून त्यांच्या मार्गाचा आधार घ्यावा, परंतु तुलना करू नये. शरीर सक्षम असेल, ऊर्जा पुरेशी असेल तर मनही साधनेला उत्साहाने प्रतिसाद देते. कारण शरीर हे साधनेचे आसन आहे आणि मन ही त्याची दिशा. शरीर सशक्त असल्यावर मनात उदासीनता किंवा कंटाळा येत नाही; मनही त्याच जोमाने स्थिर राहते. शरीर जरी प्रारब्धानुसार कधी-कधी त्रास देऊ शकते, तरी मनावर प्रारब्धाचे बंधन नसते. त्यामुळे साधकाने शरीराला प्राणायाम, योग, सूर्यनमस्कार, नियमित फिरणे, हलका व्यायाम अशा मार्गांनी सशक्त ठेवणे ही साधनेची पहिली पायरी आहे. समर्थ रामदासांनीही सांगितले आहे : धकाधकीचा मामला कैचा घडे अशक्ताला । नाना बुद्धी शक्ताला ।। अर्थ - अशक्त शरीराला मोठे काम, मोठा धर्मप्रवास किंवा प्राणशक्ती लागणारी साधना जमू शकत नाही. शरीर समर्थ असेल तर बुद्धी, प्राणशक्ती आणि मनही समर्थ राहते. धर्मकारण, समाजकारण, राजकारण- ही क्षेत्रे रणसंग्रामासारखीच असतात. निर्णयक्षमता, मनाची स्थिरता, धैर्य, शांतता, दूरदृष्टी आणि आत्मनियंत्रण या सर्व गोष्टी साधनेतूनच मिळतात. साधना म्हणजे केवळ जप किंवा ध्यान नाही; ती जीवनाला सुसंस्कृत बनवणारी ऊर्जा आहे. उत्साह असेपर्यंत शरीर साधनेसाठी सज्ज असते. पण जसजसे वय वाढते, शरीराची ताकद कमी होते; तेव्हा उत्साह वाढतो पण शरीर त्याला साथ देत नाही. अशा वेळी साधकाला अधिक सूक्ष्म साधनेचा मार्ग स्वीकारावा लागतो. वय वाढल्यावर मन अधिक स्थिर, शांत आणि आत वळलेले होते. हा काळ साधनेसाठी अत्यंत अनुकूल असतो.

जर मन एकाग्र असेल, अनुसंधान असेल, तर कमी बैठक सुद्धा अत्यंत फलदायी होते. अशा वेळी शरीराला जास्त ताण देवून केलेली जबरदस्तीची साधना 'कर्मकांड' बनते. जड शरीर आणि थकलेले अंग मनाला स्थिर होऊ देत नाही. त्यामुळे ध्यानाचा आनंद मिळत नाही. याचा अर्थ शरीराचे लाड करावेत असे नव्हे, पण देहात ऊर्जा असेल तेथे तो वापरावा; ऊर्जा कमी असेल तेथे मनावर आधारित सूक्ष्म साधना करावी. साधना ही गुरुकृपेने अनुभवायची प्रक्रिया आहे-ओढूनताणून नेम धरून नव्हे. साधना कधीही जड वाटू नये. साधना करावी म्हणूनच बैठक करणे हे बाह्य कर्तव्य होय. पण साधना आवडून, आनंदाने, प्रेमाने, अंतःकरणातून केली तर ती 'सहज साधना' बनते. सहज साधना म्हणजे : मन तटस्थ, शांत आणि प्रसन्न असणे, शरीराची मर्यादा ओळखणे, अनावश्यक ताण न देणे, श्वासावर, मंत्रावर किंवा ईश्वरनिष्ठ भावनेवर स्थिर राहणे आणि सर्वात महत्त्वाचे आनंदाने, सहजतेने साधना करणे. साधकाने स्वतःच्या शरीराची स्थिती, मनाची ताकद, वेळ, परिस्थिती यांचा विचार करून साधनेची बैठक ठरवावी. बैठकीचा कालावधी साधनेसाठी आहे- साधना बैठकीसाठी नाही. साधना ही शाश्वत आनंदाचा मार्ग आहे. ती देह, मन आणि प्राण यांना सक्षम करते. जबरदस्तीने, कर्तव्य म्हणून, कोणालाही दाखवण्यासाठी केलेली साधना कधीच आनंद देत नाही. पण प्रेमाने,

श्रद्धेने, अनुसंधानाने, गुरुकटाक्षाने केली तर साधना हे आयुष्याचे सर्वात मोठे वरदान ठरते. म्हणूनच साधकाने बैठक किती घ्यावी? जितकी सहजतेने, आनंदाने, मनाच्या शांततेने आणि शरीराच्या सामर्थ्याने घेता येईल तितकी. साधनेचे खरे सार 'बैठकीत' नसते; ते मनाच्या प्रसन्नतेत आणि ईश्वरानुभूतीच्या ओढीत असते.

## धुंदुरमास

**संगीता कुलकर्णी (मो. : ९८७०४५१०२०)**

सध्या सर्वांचा आवडता थंडीचा ऋतू सुरु आहे त्या अनुषंगाने या ऋतू मध्ये येणाऱ्या व अनन्यसाधारण महत्व असलेल्या धनुर्मासाविषयी... या काळात सूर्य धनु राशीतून संक्रमण करतो म्हणून याला धनुर्मास असे म्हणतात. या मासाला धुंदुरमास झुंझुरमास व शून्यमास असेही म्हणतात.. असे म्हणतात की दक्षिणायनाचे सहा महिने देवतांची रात्र असते व उत्तराणायचे सहा महिने देवतांचा दिवस असतो आणि हा धुंदुरमास देवतांचा ब्रह्ममुहूर्त म्हणजेच त्यांची पहाट असते... इंग्रजी व मराठी कॅलेंडर मध्ये या महिन्याचा स्वतंत्र उल्लेख जरी नसला तरी या महिन्याला अनन्यसाधारण महत्व असून हा हेमंत व शिशिर ऋतू मध्ये येतो.. मराठी महिन्यानुसार मार्गशीर्ष व पौष मध्ये व इंग्रजी महिन्यानुसार डिसेंबर मध्यापासून जानेवारी मध्यापर्यंत असतो.. या महिन्यास शून्यमास असेही म्हणतात कारण या मासात लग्नकार्य, प्रॉपर्टीची खरेदी इ.अशी अनेक शुभकार्ये करत नाहीत.. हा संपूर्ण महिना आपल्या देव देवतांचे प्रती अर्पण असतो.. सूर्योदयापूर्वी भल्या पहाटे ब्रह्ममुहूर्तावर उठून स्नान करून देवांची पूजाअर्चा आराधना, भजन अशी आपापल्या परीने भक्ती करतात.. या महिन्यात विशेषकरून भगवान विष्णूची व श्रीकृष्णाची आराधना करतात.. इतकचं नाही तर वसुंधरेला व चराचराला जीवन व आरोग्य प्रदान करणारी देवता सूर्याचीही आराधना केली जाते... तसेच अध्यात्माची आवड असणाऱ्या लोकांना आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी तर हा पर्वणीचा काळ म्हणता येईल... ब्राह्ममुहूर्तावर उठून मेडिटेशन, योग व प्राणायाम यासाठी हा अतिशय उत्तम असास काळ आहे. पूर्वी लोक पहाटे उठून घराबाहेर पडून जवळच्या देवळात भजन कीर्तन यासाठी एकत्र जमत तर काही जण एकत्र जमून पहाटे वनभोजनास जात असत.. यावरून असं लक्षात येतं की पहाटे फिरावयास जाण्याला अतिशय महत्त्व दिले गेले आहे... जर ह्याचा शास्त्रीय दृष्टया विचार केला तर या महिन्यात पहाटेच्या वेळेला म्हणजेच ब्रह्ममुहूर्ताला ओझोन लेअर अतिशय शुद्ध असते.. शुद्ध ऑक्सिजनचे प्रमाण भरपूर असते तसेच वातावरण प्रदूषणरहित, आल्हाददायक व उत्साहवर्धक असते त्यामुळे पहाटे फिरावयास जाण्यास तसेच व्यायाम करण्यास अतिशय महत्व दिलेले आहे.. या गोष्टी चांगल्या आरोग्यासाठी अतिशय लाभदायक आहेत नाही का...! आता तुम्ही म्हणाल की इतक्या पहाटे उठून वनभोजनाची काय आवश्यकता आहे? तर हा काळ अतिशय थंडीचा असतो व आपल्या शरीराला त्याची ऊर्जा कायम टिकवायची असते. आपणा सर्वांना या वाढलेल्या थंडीच्या कडाक्याला सामोरे जायचे असते त्यामुळे आपल्या शरीरातील जठराग्नी पहाटेच प्रज्वलित झालेला असतो म्हणजेच पहाटे लवकर भूक लागलेली असते त्यामुळे शरीराला उष्णतावर्धक व स्निग्ध पदार्थांची अतिशय आवश्यकता असते.. या ऋतूमध्ये मिळणाऱ्या भाज्या, बाजरीसारखी धान्ये खायचे महत्त्व फार आहे.. हे खाणं इतर ऋतूंमध्ये पचायला जड असलं तरी या महिन्यात-या ऋतूमध्ये मात्र राजस मानलं गेलं.. वर्षभर खाण्यातून मिळणारी एनर्जी आपल्याला फक्त या एका महिन्यातल्या खाण्यातून मिळवता येते एवढं याचं प्रचंड महत्त्व पूर्वजांकडून सांगितलं गेलं आहे... मग अशावेळी या काळात तीळ लावलेली बाजरीची भाकरी त्यावर लोणी, भरली वांगी, लेकुरवाळी भाजी

(वांगी, फरसबी, मटार, हरबरा, गाजर, पावटा, हुरड्याचे दाणे व हिरवी पालेभाजी) तांदूळ व मुगाची डाळ घालून केलेली खिचडी, तीळ व गूळ घालून केलेली गोड पोळी (गुळपोळी) व त्यावर साजुक तुपाची धार असा पौष्टिक आहार या थंडीच्या काळात घेतात... तसेच तीळ, गूळ व शेंगदाणे याचा एकत्र करून केलेला लाडू, मुगाचे लाडू व हळिवाचे लाडू खातात यामुळे आपले आरोग्य चांगले राहते..या सर्व पदार्थांचा नैवेद्य भोगीला सूर्याला दाखविला जातो व ह्या धनुर्मासाची सांगता केली जाते.. या काळात हुरडा खातात त्यासाठी विविध ठिकाणी हुर्डापार्टीचे ही आयोजन केले जाते.. अशाप्रकारे विविधप्रकारांनी धुंधुरमास साजरा केला जातो... तुमचे आरोग्य असेच पौष्टिक पदार्थ खाऊन येणाऱ्या धुंधुरमासाचा लाभ घेऊन सुधृढ राहो...

## महर्षी बालखिल्य

**सौ. कुंदा कुलकर्णी**

महर्षी बालखिल्य हे महर्षी कृतु आणि सन्नीता यांचे पुत्र. प्रजोत्पादनासाठी आणि तपस्या करण्यासाठी महर्षी कृतु यांनी आपल्या केसांपासून त्यांना निर्माण केले. ते साठ हजार होते. त्यांचा आकार अंगठ्या इतका लहान होता. ते सूर्याचे उपासक होते. ते सूर्य लोकात रहात. पक्षांप्रमाणे एक एक दाणा वेचून ते आपला उदरनिर्वाह करत असत. ते सदैव सूर्याकडे तोंड करून फिरत असत. त्यांच्या तपस्येचे तेज सूर्याला मिळत असे. ते सूर्याच्या अल्ट्राव्हायोलेट रेडियमच्या तीव्रतेपासून जगाचे संरक्षण करीत असत. बालखिल्य हा दैवी ऋषींचा समूह आहे. ते शरीराने लहान पण तपस्वी म्हणून महान आहेत. एकदा महर्षी कश्यप यांनी यज्ञ


JV MARKETING & INVESTMENTS
*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande* — *+91 98330 25031*
*MBA - Marketing* — *jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*
*MahaRERA ID - A51900028785* *@jvmarketing18* *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

करण्याचे ठरवले. त्यांनी कृतु ऋषींना सांगितले तुम्ही माझ्या यज्ञात ब्रह्माचे स्थान ग्रहण करा व आपल्या सर्व पुत्रांना घेऊन या. महर्षी कृतुंनी आमंत्रण स्वीकारले. देवराज इंद्रही त्या ठिकाणी होते. महर्षी कश्यप यांनी सर्वांना यज्ञासाठी समिधा आणण्यास सांगितले. इंद्राने खूप समिधा आणल्या. पण बालखिल्य थोड्याच समिधा आणू शकले. इंद्राने चेष्टा केली. विचारले, हे वीतभर लाकूड घेऊन कशाला आलात? हा यज्ञ तुमच्या आकाराप्रमाणे छोटा असेल असे तुम्हाला वाटले का? बालखिल्ल्यांना उपहास समजला. तरीही कश्यप ऋषींसाठी शांत राहून ते म्हणाले, आम्ही यज्ञासाठी समिधा आणल्या आहेत. त्यांच्या आकाराकडे न पाहता आमचा समर्पण भाव पहा. इंद्र म्हणाला, तुम्ही देवराज इंद्राशी बोलत आहात लक्षात आहे का? बालखिल्यांना खूप राग आला . इंद्राला धडा शिकवण्यासाठी ते म्हणाले, तुला इंद्रपदाचा गर्व आहे म्हणून आम्ही संकल्प करतो की आम्ही आमच्या योग बलाने तुमच्यापेक्षा कैक पटीने शक्तिशाली, बुद्धिमान आणि सद्गुणी इंद्र निर्माण करू. इंद्र घाबरून कश्यपांकडे गेला. कश्यपांनी बाल खिल्यांची समजूत घातली व सांगितले, जगात इंद्र एकच असणार तेव्हा त्याला क्षमा करा. बालखिल्यांना आपला संकल्प परत घेणे कठीण होते. ते म्हणाले, आम्ही संकल्प परत घेऊ शकत नाही. पण बदल करू शकतो. तुम्ही पुत्रप्राप्तीसाठी यज्ञ करत आहात. तुमचा पुत्र अतिशय पराक्रमी, शक्तिशाली असा प्राणी असेल जो पक्षांचा इंद्र होईल. आमचा संकल्पही पूर्ण होईल आणि इंद्र पदाचे महत्व ही कमी होणार नाही. कश्यपांची पत्नी विनता हिने गरुडाला जन्म दिला आणि गरुड भगवान विष्णूचे वाहन बनले. तसेच त्याला पक्षांचे इंद्र असे नाव पडले. त्यांनी बालखिल्ल्य संहिता रचली. ते केदार खंड मध्ये तपस्या करीत होते. तिथे एक नदी आहे तिचे नाव बालगंगा. ऋग्वेदाच्या आठव्या मंडलाच्या शेवटी एक परिशिष्ट आहे. त्याला बालखिल्यसूक्त असे म्हणतात. एकदा गरुडाला खूप भूक लागली. त्याने वडिलांना विचारले, मी काय खाऊ? तेव्हा ते म्हणाले, समुद्रात एक मोठे कासव आहे आणि वनामध्ये एक महाभयंकर हत्ती आहे. दोघेही खूप क्रूर आहेत. तू त्यांना खा. गरुडाने दोघांना पकडले व तो सोमगिरी पर्वतावर गेला. तिथे एका उंच वृक्षावर काही ऋषी उलटे लटकून तपस्या करत होते. गरुड त्याच फांदीवर बसला. त्याच्या वजनाने ती फांदी तुटू लागली. गरुडाने आपल्या चोचीत ती फांदी पकडली आणि कश्यप ऋषींकडे आला. कश्यप ऋषी म्हणाले, हे बालखिल्य ऋषी आहेत. त्यांना त्रास दिलास तर ते शाप देऊन तुला भस्म करतील. गरुडाला वाचवण्यासाठी त्यांनी बालखिल्य ऋषींना प्रार्थना केली की तुम्ही फांदीवरून खाली या. बाल किल्ल्यांनी कश्यपांची प्रार्थना ऐकली. ते खाली आले आणि हिमालयात तपस्या करण्यासाठी निघून गेले. असे हे आकाराने लहान पण कर्तृत्वाने महान असे तपस्वी बालखिल्य ऋषी. त्यांना कोटी कोटी प्रणाम.

## भाडेकरू आपोआप मालक होत नाही

### ॲड. रोहित एरंडे

सर्वप्रथम सर्व वाचकांना नवीन वर्षाच्या अनेकोत्त्म शुभेच्छा. या प्रश्नाच्या निमित्ताने नवीन वर्षात व्हॉट्सॲप, यूटयुबवर आलेल्या बातम्यांवर अंधविश्वास ठेवणार नाही असा पण नवीन सर्वांनी करूयात. आता वळूयात तुमच्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे. बरेच जणांना असे वाटते की, १२ वर्षांपेक्षा जास्त काळ भाडेकरू राहिला की तो आपोआप मालकच होतो. असे जर असते, तर आत्तापर्यंत भारतभर हाहाकार उडाला असता! हा जो काही १२ वर्षांपेक्षा जास्त काळ राहिल्यावर मालकी सांगता येते या दाव्याला कायद्याच्या भाषेत ।कअमतेम च्वेमेपवद किंवा प्रतिकूल ताबा असे म्हणतात. लिमिटेशन ॲक्ट, १९६३ मधील ही एक क्लिष्ट

संकल्पना आहे आणि ती अर्थातच घरमालक - भाडेकरू या नात्याला लागू होत नाही. प्रतिकूल ताबा याचा अगदी सोपा अर्थ असा की, एखाद्या व्यक्तीकडे दुसऱ्या व्यक्तीच्या जागेचा ताबा जागा मालकाच्या परवानगीशिवाय, थोडक्यात कोणत्याही लेखी-तोंडी कराराशिवाय आणि १२ वर्षे विनाअडथळा असेल, तर मूळ मालकाचा मालकीहक्क जाऊन ती व्यक्ती अशा जागेची मालक होते. मात्र यामध्ये अनेक पदर आहेत, प्रत्येक गोष्ट अशी मालकी मागणाऱ्याला पुराव्याने सिध्द करावी लागते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रतिकूल ताबा न्यायालयाने मान्य करावा लागतो. घरमालक - भाडेकरू या नात्यात जागेचा ताबा हा घरमालकाच्या परवानगीने अनुकूल ;च्मतउपेपअम च्वेमेपवदद्ध असल्यामुळे आणि कोणतातरी करार, भाडे पावती असल्यामुळे ॲडव्हर्स पझेशनचे तत्त्व इथे अजिबात लागू होत नाही. अगदी अलीकडे एका केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने १९४४ सालापासून भाडेकरू असलेल्या भाडेकरूंचा ॲडव्हर्स पझेशनने मालकीहक्क मिळाल्याचा दावा खोडून काढताना नमुद केले की, भाडेकरूंचा ताबा हा कराराला बांधील असतो आणि असा ताबा १२ वर्षानंतर घरमालकाला प्रतिकूल होत नाही. खरेतर ॲडव्हर्स पझेशन ही अन्यायकारक आणि बेकायदा ताब्याला खतपाणी घालणारी तरतूदच सरकारने रद्द करायला हवी, असे स्पष्ट मत सर्वोच्च न्यायालयाने २००९ मध्ये व्यक्त केले आहे. २०१२ साली देखील सर्वोच्च न्यायालयाच्या तीन सदस्यीय खंडपीठाने 'मारीया फर्नांडिस वि. इरॅसमो सिक्वेरीआ' या केसमध्ये नमुद कले आहे की, ''केअर टेकर, वॉचमन, नोकर किंवा प्रेमापोटी जागा वापरायला दिलेल्या व्यक्ती ज्यांच्याकडून कोणतेही पैसे न घेता म्हणजेच आपुलकीने किंवा मेहेरबानीने जागा दिली आहे, अशा व्यक्ती या जागेमध्ये कितीही वर्षे राहत असल्या, तरी त्यांना कोणताही हक्क/ अधिकार प्राप्त होत नाही आणि अशा व्यक्तींकडे जरी जागेचा ताबा असला तरी तो जागामालकाच्या वतीनेच असतो. '' दुसरी गोष्ट, तुम्हाला जागेची खरंच गरज असेल ;ठवदंपिकम त्मुनपतमउमदजद्ध तर आता


**JAYANT DESHMUKH**
B.COM., CAIIB DBM

**Dr. AMIT DESHMUKH**
*Assistant Professor* B.Com., MA., Ph.D.

• Authorised Insurance Advisor • Investment Consultant
• Mediclaim • AMFI Registered Mutual Fund Partner

M. : 9930445721 / 9702837022 deshisbijayant@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

◎ Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
◎ Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance
◎ Trustee & Treasurer - Balaji Mandir Trust, Kalyan
◎ President - Karnataka Sangha, Kalyan
◎ Past Vice President - Andhra Association, Kalyan
◎ Past Manager - State Bank of India
◎ Housing Loan Provider
◎ Member - BBNG Kalyan
◎ Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
◎ Joint Treasurer - DRBS Kalyan

◎ Certified Astrologer
◎ Meditation
◎ Palmist
◎ Yoga
◎ Numerologist
◎ Vastu
◎ Bhakti Shastri
◎ Cyber Crime Investigator

या कारणास्तव जागेचा ताबा मागणे सोपे झाले आहे. सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाने अनेक निकालांमधून हे स्पष्ट केले आहे की, ''स्वत:ला जागेची गरज आहे हे ठरवण्यासाठी घरमालकाएवढा दुसरा उत्तम न्यायाधीश नाही आणि न्यायालय किंवा भाडेकरू देखील घरमालकाला त्याची गरज चूक का बरोबर याबाबत सूचना देऊ शकत नाही,'' सबब तुम्ही आधी नोटीस देऊन जागेचा ताबा मागा. भाडेकरूंनी सामोपचाराने न घेतल्यास न्यायालयात दावा दाखल करू शकता. यासाठी वकिलांची मदत घ्या.

## संलग्न संस्था वृत्त

* **ठाणे** : वाचन प्रेरणा दिनानिमित्त अक्षरमंच सामाजिक सांस्द्रतिक प्रतिष्ठान, दैनिक ठाणे वैभव, सुस्वर क्रिएशन्स व माऊली एक शैक्षणिक ध्यास या संस्थांच्यावतीने 'वाचू आनंदे' लेख स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ज्येष्ठ लेखिका संगीता कुलकर्णी यांच्या लेखाची सर्वोद्धष्ट म्हणून निवड करण्यात आली. ज्येष्ठ साहित्यिक अशोक वागवे यांच्या हस्ते त्यांना 'वाचन प्रेरणा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या लेखनाने नव्या पिढीला वाचनाची प्रेरणा मिळत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

* **नाशिक** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राषण मध्यवर्ती मंडळाकडून दरवर्षी देण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पारितोषिकांच्या धनादेशांचे वितरण दत्तजयंतीचे औचित्य साधून उपस्थित पदाधिकाऱ्याच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी पालकांनी बोलक्या प्रतिक्रिया नोंदवल्या अशा पारितोषिकांमुळे मुलांना अधिक चांगले यश मिळविण्यासाठी प्रोत्साहन मिळतच पण गरीब व होतकरू मुलांना आर्थिक सहाय्य होते. नाशिकच्या देशस्थ ऋग्वेदी संस्थेच्या सहकार्याबद्दल अनेकांनी संस्थेला धन्यवाद दिले. संस्थेच्यावतीने अध्यक्ष मुकुंद कुलकर्णी, कार्याध्यक्ष सुहास पाटील, व कार्यवाह मकरंद सुखात्मे यांनी मुलांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, पालक, संस्थेचे व्यवस्थापक दिपक जहागिरदार, कर्मचारी सौ. दिप्ती हिंगणे व दत्तात्रय देवळालकर उपस्थित होते.

* **मुलुंड :** श्री. आनंद माडगूळकर यांचा माझ्या खिडकीतून ग.दि.मा हा खास कार्यक्रम २० डिसेंबर २०२५ रोजी आयोजित केला होता आणि तो खूपच यशस्वी झाला. श्री. प्रफुल निमदेव यांनी या कार्यक्रमाचे संपूर्ण जबाबदारी समर्थपणे पार पाडली. श्री. उल्हास कुलकर्णी, श्री. शशिकांत जहागीरदार व सौ रेणुका कुलकर्णी यांची सुद्धा आयोजनाच्या कामात खूप मदत झाली. कार्यक्रमाची सुरुवात विश्वस्त प्रमुख श्री. वडगबाळकरजी, अध्यक्ष श्री. अशोक जहागीरदारजी व श्री. आनंद माडगूळकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलाने झाली. यावेळी सौ पूजा निमदेव यांनी सुश्राव्य ईशस्तवन गायले.नंतर श्री. नितीन देशपांडे यांनी श्री. आनंद माडगूळकर यांचा परिचय करून दिला सौ रेणुका कुलकर्णी यांनी या सगळ्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केलं व श्री. आनंद माडगूळकर यांची मुलाखत घेतली. खूपच उद्बोधक व अभ्यासपूर्ण प्रश्न विचारले आणि सर्व प्रेक्षकांचे मन जिंकली. श्री. आनंद माडगूळकर यांनी त्यांचे तीर्थरूप श्री. ग.दि.मा यांचा जीवनपट उलगडून दाखवला आणि प्रेक्षकांनाही तो अतिशय भावला. एकंदरीत कार्यक्रम उत्तम झाला. प्रेक्षकांनी पण खूप उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रेक्षक पण मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. प्रफुल्ल निमदेव यांच्या आभार प्रदर्शनाने या बहारदार कार्यक्रमाची सांगता झाली.

* **छत्रपती संभाजीनगर :** येथील दे. ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळाच्या वतीने नुकताच गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आणि शिष्यवृत्ती वाटप समारंभ आयोजित करण्यात आला होता. समाजात शिक्षणाचे महत्त्व रुजवण्याच्या आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार

पडला. ज्या विद्यार्थ्यांनी दहावी आणि बारावीच्या परीक्षेत ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून उत्कृष्ट यश संपादन केले, अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला. या विद्यार्थ्यांना 'मध्यवर्ती मंडळ, मुंबई' आणि 'दे. ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळ, छत्रपती संभाजीनगर' यांच्या संयुक्त विद्यमाने शिष्यवृत्तीचे धनादेश (चेक) प्रदान करण्यात आले. या समारंभासाठी मंडळाचे पदाधिकारी, गुणवंत विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवर: कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष श्री. रवींद्र जेहुरकर हे होते. त्यांच्यासोबत महिला अध्यक्षा सौ. मोनिकाताई चौधरी, उपाध्यक्ष श्री. श्रीपाद मुगुटे, सचिव श्री. नरेश पटवर्धन आणि कोषाध्यक्ष श्री. अंबादास कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून मंचावर उपस्थित होते.

* **डोंबिवली :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवली यांचे ५६वे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक १४डिसेंबर २०२५ रोजी माऊली या विशाल सभागृहात संपन्न झाला. ह्या सोहळ्यात सुमारे ४०० सभासद / निमंत्रित बंधू भगिनी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले. त्यानंतर सुप्रसिद्ध कलाकार सौ आरती मुनीश्वर यांनी राजमाता जिजाऊ हा सुंदर एकपात्री कार्यक्रम सादर केला. अध्यक्ष श्री. जे.के. जोशी यांच्या हस्ते सौ. आरतीताईंचा उचित सन्मान करण्यात आला. संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात संमेलनाध्यक्ष श्री. संजीव ब्रह्मे, प्रमुख अतिथी श्री. अविनाश सुभेदार, सन्माननीय अतिथी डा हरी शंकर महाशब्दे, मध्यवर्ती मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकरपंत कुलकर्णी, संस्थेचे अध्यक्ष श्री. जगन्नाथराव जोशी, विश्वस्त अध्यक्ष श्री. नारायणराव रत्नपारखी, उपाध्यक्ष श्री. मानस पिंगळे आणि कार्यवाह श्री. प्रकाश कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व शाल, चांदीचे नाणे देऊन सत्कार केला. विश्वस्त अध्यक्ष श्री. नारायण रत्नपारखी यांनी त्यांच्या भाषणात संस्थेची आतापर्यंत झालेली वाटचाल, त्यासाठी आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी केलेले प्रयत्न याचे विश्लेषण करून संस्थेच्या पारदर्शक कारभाराबद्दल विश्वस्तांतर्फे पूर्ण समाधान व्यक्त केले. अध्यक्ष श्री. जगन्नाथ जोशी यांनी, संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली आणि सांगितले की आमच्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवली संस्थेने २०२५ या वर्षात शिक्षणाला अग्रभागी ठेवून ज्या मुला-मुलींचे, शालेय फी न भरता आल्यामुळे शिक्षण थांबण्याची शक्यता निर्माण झाली होती अशा शालेय मुला मुलींचा शोध घेऊन त्यांची वर्षाची पूर्ण फी चेक द्वारे त्या शाळांना दिली आणि अशा ३२ मुला मुलींचं शिक्षण सुरू केलं त्यासाठी रुपये १५०,०००/-ची मदत या शाळांना दिली तसेच खोणी येथील अमेय पालक संघटना या संस्थेला गतिमंद आणि मतिमंद मुलांसाठी २५ हजार रुपयाची मदत केली आहे. युवा समितीतर्फे प्रतिनिधी श्री. दीपक कुलकर्णी यांनी युवा समितीच्या कार्याची माहिती दिली. श्री. अविनाश जगन्नाथ सुभेदार यांनी यूपीएससी परीक्षेत, भगवद्गीतेने आपल्याला सतत प्रेरणा दिली, उत्तम यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम, सातत्याने सखोल अभ्यास आणि आत्यंतिक आत्मविश्वास या तीन महत्त्वाच्या घटकांची आवश्यकता सांगितली युवकांनी सातत्याने भरपूर अभ्यास करून, आत्मविश्वासाने यूपीएससी परीक्षा देऊन उच्च पदे मिळवावीत व भगवद्गीतेचा आदर्श ठेवून, प्रामाणिकपणे काम करून जनसेवा करावी असा बहुमोल संदेश दिला. शिक्षण क्षेत्र - डॉ.दीपक देशपांडे, डॉ.दीपक कुलकर्णी, सीए हर्षदा कुलकर्णी-कानिटकर आणि डॉक्टर संजय कुलकर्णी. अध्यात्म क्षेत्र - सौ. रेखा उटगीकर, बँकिंग - श्री. हेमंत दरगोडे, क्रीडा - आर्यन शिरवळकर, साहित्य क्षेत्र - श्री. पुंडलिक पै, पत्रकारिता - श्री. मिलिंद सरदेशमुख आणि जान्हवी मोर्ये, कर्तृत्ववान महिला - सौ. वंदना एडकी, सेवा विभाग - श्री. संजय कानिटकर, कला विभाग छायाचित्रण - श्री. सुधीर बर्डे वरील व्यक्तींचा पुष्पगुच्छ व शाल, चांदीचे नाणे देऊन सत्कार केला. सन्माननीय अतिथी श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी मनोगत

व्यक्त करताना, मध्यवर्ती मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली आणि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवलीच्या विविध उपक्रमांबद्दल / कार्यक्रमांबद्दल तसेच उत्तम नियोजनाबद्दल डोंबिवली संस्थेचे कौतुक करून रुपये ११०००/-ची देणगी दिली. अकोला येथीलआयुर्वेद विद्यापीठात ३१ वर्ष प्राचार्य असलेले डॉक्टर हरिशंकर महाशब्दे यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या भाषणात, ज्ञाती बांधवांची सेवा हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आपण अकोला येथे देशस्थ ऋग्वेदी मंडळात गेली तीस वर्ष अध्यक्षपदावर असून मंडळाच्या सर्वकष प्रगतीसाठी कार्य केल्याचे सांगितले तसेच उत्कृष्ट उपक्रमाबद्दल डोंबिवली संस्थेचे अध्यक्ष श्री. जे.के. जोशी यांचे कौतुक करून सर्व संस्थांनी त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा असे सांगितले देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवली संस्थेने ५६व्या स्नेहसंमेलनानिमित्त काढलेली ऋग्वेद स्मरणिकेचे संमेलनाध्यक्ष श्री. संजीव ब्रम्हे यांच्या शुभ हस्ते या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. या संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन सौ शुभदा कुलकर्णी आणि सौ सरोज कलंत्रे यांनी केले. आभार प्रदर्शन, प्रार्थना व त्यानंतरच्या अतिशय सुग्रास चविष्ट भोजनाने ह्या आनंद सोहळ्याची सांगता झाली. हे संमेलन अत्यंत देखणे व अविस्मरणीय झाले ते केवळ अध्यक्ष जे के जोशी यांच्या आखीव् रेखीव नियोजन बद्धतेमुळे आणि उत्कृष्ट आयोजनामुळे! विश्वस्तांचे मार्गदर्शन तसेच कार्यकारिणींच्या पदाधिकाऱ्यांनी व सभासदांनी एकजुटीने केलेले काम, आणि मेहेनत यामुळे! उपाध्यक्ष मानस पिंगळे, सहकार्यवाह श्री. जयंत कुलकर्णी, सहकार्यवाह सौ नीलिमा चिंचणकर यांच्यासह सत्कार समिती, स्वागत समिती, आणि इतर समित्यांचे या साऱ्यांचे मनापासून कौतुक आणि संमेलनाला पूर्ण सहकार्य करणाऱ्या सर्व रसिक सभासद, प्रेक्षकवर्गाचे आणि उपस्थित यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

## फक्त जगण्यासाठी नाही, तर जिवंत वाटण्यासाठी - माझा अनुभव

**ॲड. कौस्तुभ रायरीकर** (मो.: ९७६६४१४३३५)

कधी काळी मला असं वाटायचं की सर्व प्रश्नांची उत्तरं किंवा सर्वात शक्तिशाली पुस्तक म्हणणं ही फक्त एक हुशार मार्केटिंगची युक्ती आहे. पण कोविड लॉकडाऊनच्या काळात, वेळ मिळाला म्हणून मी पहिल्यांदाच गीता वाचायचं ठरवलं. मागे वळून पाहतो तेव्हा वाटतं - माझ्या आयुष्यातला तो एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय होता. का? चला, आज त्याचं उत्तर शोधूया. सुरुवात - एक तर्कशुद्ध वादविवाद गीतेच्या पहिल्या अध्यायात, अर्जुन रणांगणाच्या मध्यभागी उभा आहे - शंका, गोंधळ आणि निराशेने भरलेला. जिंकले तरी हरले, हरले तरी हरले अशा अवस्थेत अडकलेला. शेवटी तो आपली शस्त्रं खाली ठेवतो, आणि कृष्णाला प्रश्न विचारतो. कृष्ण त्याचा गोंधळ ओळखतो - अगदी शल्यचिकित्सकाच्या नेमकेपणाने. आणि मग एक वाक्य बोलतो, जे सर्व भ्रम दूर करतं: अर्जुना, या संकटाच्या काळात तुला ही मोहाची झाक का आली? हे क्षत्रियाला शोभणारे नाही. हे तुला कीर्तीऐवजी अपकीर्ती देईल. अशा दुबळेपणाला बळी पडू नकोस. उठा, पराक्रमी पार्थ! (गीता २.२-३) अर्जुनकडे आता लपण्यासाठी काहीच उरलेलं नसतं. कृष्णाने त्याच्या 'खऱ्या जखमेवर' हात ठेवलेला असतो. थोडा वादविवाद झाल्यावर अर्जुन शरणागती पत्करतो: मी माझं कर्तव्य काय हे न कळल्याने गोंधळलो आहे. मी तुमचा शिष्य आहे - कृपया मला सांगा, माझ्यासाठी खरं योग्य काय आहे. (गीता २.७) हा क्षण मला नेहमी विचार करायला लावतो. कारण इथून पुढे अर्जुन आणि कृष्ण यांचं नातं गुरु-शिष्याचं होतं. आणि त्या संवादात एक गोष्ट मला खूप शिकवते - खरा गुरु तोच, जो आपल्याजवळ

पुरेसा येऊ शकतो, आपल्या सबबींवर थेट प्रश्न करू शकतो. आपल्यातील बरेच लोक शहाण्या लोकांना 'सल्लागार' म्हणून दूर ठेवतात - ऐकतात, पण खऱ्या अर्थाने बदलत नाहीत. पण कृष्ण सल्ला देत नाही - तो अर्जुनच्या रथात उभा आहे, अगदी त्याच्या शेजारी. आणि मग तो सांगतो - तुला फक्त कर्म करण्याचा अधिकार आहे; पण फळावर हक्क नाही. फळाची अपेक्षा न करता, यश-अपयशात समत्व ठेवून कर्म कर. असं करणं म्हणजे योग. (गीता २.४७-४८) इथून पुढे सुरू होतं कर्मयोगाचं तत्त्व - फळाशी आसक्ती न ठेवता कृती करणं. जीवनातही आपण परिणाम नियंत्रित करू शकत नाही, पण प्रयत्न मात्र आपल्या हातात असतात. दृष्टीकोनातला बदल संवाद पुढे सरकतो तसा कृष्ण अधिक खोल ज्ञान देतो. जेव्हा धर्माचा नाश होतो आणि अधर्म वाढतो, तेव्हा मी स्वतः पृथ्वीवर अवतरतो. (गीता ४.७) इथे कृष्ण फक्त गुरु राहत नाही; त्याच्या शब्दांना आता दिव्य वजन प्राप्त होतं. अंतर्गत संघर्ष आणि आत्मबोध कृष्ण अर्जुनाला सांगतो - मनुष्य स्वतःच आपला मित्र आहे, आणि स्वतःच आपला शत्रू. (गीता ६.५) या एका वाक्यात गीतेचा खरा अर्थ सामावलेला आहे. खरं रणांगण म्हणजे कुरुक्षेत्र नाही, तर आपल्या मनाचं क्षेत्र आहे. गीता आंधळ्या श्रद्धेचं पुस्तक नाही, तर स्वतःच्या शंकांवर तर्क आणि साधनेने विजय मिळवण्याचा मार्ग आहे. परम दर्शन जेव्हा अर्जुन कृष्णाला त्याचं खरं रूप दाखवायला सांगतो, तेव्हा कृष्ण त्याला विश्वरूप दर्शन देतो - आणि अर्जुन स्तब्ध होतो. इथून पुढे संवाद तर्कावरून अनुभवाकडे जातो. तर्क मनाला पटवतो, पण अनुभव आत्म्याला बदलतो. कर्माच्या पलीकडचं ज्ञान माझ्या समजुतीनुसार, कृष्ण सांगतो की खरा भक्तीमार्ग फक्त पूजा किंवा विधी नाही - तर आपल्या कृती आणि विचारांना एखाद्या उंच तत्त्वाशी जोडणं आहे. सर्व कर्म मला अर्पण कर, आणि माझं साधन बन. (गीता ११.३३) ज्ञानापेक्षा ध्यान श्रेष्ठ आहे, पण कर्मफळाचा त्याग केल्याने तत्काळ शांतता मिळते. (गीता १२.१२) कृष्ण आपल्याकडून अंधभक्ती नाही मागत - तो आपल्याकडून अहंकाररहित कृती मागतो. जेव्हा तो म्हणतो मला अर्पण कर, त्याचा अर्थ देवाला चांदीचा फळा देणं नाही, तर स्वतःला एक साधन बनवणं आहे. विनम्रता, कपटाचा अभाव, क्षमा, संयम, गुरुसेवा, स्वच्छता, आत्मसंयम, जन्म-मृत्यू-वार्धक्याचं भान, आसक्तीचा अभाव, एकाग्रता, सत्याच्या शोधाची तळमळ - हे सगळं ज्ञान आहे. आणि याच्या विरुद्ध जे काही आहे, ते अज्ञान आहे. (गीता १३.८-१२) गीता म्हणजे फक्त विचार नाही - ती अभ्यासाची पद्धत आहे. गीतेचा कायमस्वरूपी प्रभाव हळूहळू कृष्ण एखाद्या दूरच्या व्यक्तीप्रमाणे वाटत नाही; तो एक उपस्थिती बनतो - कधी मार्गदर्शक, कधी आरसा. जेव्हा जेव्हा मी संकटात सापडतो, तेव्हा मी विचार करतो - काय माझ्या नियंत्रणात आहे, आणि काय नाही. जेव्हा कुणाचं निधन होतं, तेव्हा स्वतःला सांगतो - शरीर मरतं, पण आत्मा अमर आहे. गीता एकदा मनात शिरली की विसरता येत नाही - कारण कृष्ण आता फक्त पुस्तकात नसतो, तो आपल्या विचारांत जिवंत असतो. पहिल्यांदा वाचताना मला वाटलं होतं की ही संवादशैली किती प्रभावी आहे - कृष्णाने अर्जुनाच्या शंका कशा एकेक करून मोडल्या आणि त्याला निराशेपासून कृतीकडे नेलं. पण जेव्हा आयुष्याने स्वतः प्रश्न विचारायला सुरुवात केली, तेव्हा त्या शब्दांचं वजन वेगळंच जाणवलं. तेव्हा समजलं - गीता ही वाचायची गोष्ट नाही, ती जगायची गोष्ट आहे. मी तुला हे सर्वात गुप्त ज्ञान सांगितलं आहे. आता तू विचार कर आणि आपल्या इच्छेनुसार कृती कर. (गीता १८.६३) अर्जुना, तू एकाग्रतेने ऐकलंस का? तुझं अज्ञान नष्ट झालं का? (गीता १८.७२) माझा भ्रम दूर झाला आहे, आता मी तुझ्या सांगण्याप्रमाणे कर्म करीन. (गीता १८.७३) गीता कधीही विश्वास लादत नाही - ती समज निर्माण करते. आणि एकदा ती समज निर्माण झाली की, वरवरच्या अर्थावर परत जाणं अशक्य होतं. कारण ती आपल्या मनात जिवंत राहते - जिथं आणि जेव्हा तिची गरज असते, तिथं ती स्वतः उमलते.

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे** ........................................................................................................

*** अनुप अनिलकुमार लोणकढी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०२/०४/१९८९, **जन्म वेळ :** सकाळी ११.१५, **जन्म ठिकाण :** धारवड, **उंची :** ५.४, **रक्तगट** : ए (-), **गोत्र :** वशिष्ठ, **रास :** मकर, **नक्षत्र :** धनिष्ठा, **नाडी:** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** डिप्लोमा इन ॲनिमेशन, **नोकरी/ व्यवसाय :** अंबरनाथ, **वार्षिक उत्पन्न :** ६ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ८२३७७७६८८९/९७६६४९११३८

*** सागर दत्तात्रय मंडलिक (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १७/०४/१९८९, **जन्म वेळ :** सायंकाळी ६.१७, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.४, **गोत्र :** भार्गव, **रास :** सिंह, **नक्षत्र :** पूर्वा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** डिप्लोमा इन इंजिनीयअरिंग, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी (नाशिक), **वार्षिक उत्पन्न :** ६ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९९७५१०८६८०

*** राजेंद्र चंद्रकांत दिवेकर** (देशस्थ **ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १९/०१/१९९०, **जन्म वेळ :** रात्री ००.५०, **जन्म ठिकाण :** शहापूर, **उंची :** ५.२, **रक्तगट** : ए (+), **गोत्र :** कुत्स, **रास :** तुला, **नक्षत्र :** चित्रा, **नाडी :** मध्य, **गण:** मनुष्य, **शिक्षण :** एम. कॉम. इंटर आयसीडब्ल्यूए, बी. एड, **नोकरी/ व्यवसाय :** एमएसइबी (कळवा), **वार्षिक उत्पन्न:** ७ लाख २० हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९८६०१९३५९३/७७४१८५१७७४/९३२१४०४५०९

*** रोहन राजेश देशमुख (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १३/०६/१९९२, **जन्म वेळ :** दुपारी २.५३, **जन्म ठिकाण :** सागर एम पी, **उंची :** ५.१०, **रक्तगट** : बी (+), **गोत्र :** पूर्वामानस, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** अनुराधा, **नाडी:** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. कॉम, एमबीए, (इंटरनॅशनल बिझनेस), **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** १८ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९८६७३१०६९९/९१३७९९८७२२

*** अंकुश मनोहर देशपांडे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २२/०९/१९९२, **जन्म वेळ :** रात्री १०.५०, **जन्म ठिकाण :** अंबरनाथ, **उंची :** ५.७, **रक्तगट** : ओ (+), **गोत्र :** बाष्कळ, **रास :** कर्क, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण:** बॅचलर ऑफ फायनान्शिअल मार्केट्स, **नोकरी/ व्यवसाय :** प्रायव्हेट लिमिटेड मालक, **वार्षिक उत्पन्न :** २ लाख ६४ हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९९६००७२०७४/८७७९५७५६१२

*** मकरंद सुभाषराव कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०७/०८/१९९२, **जन्म वेळ :** दुपारी १.४५, **जन्म ठिकाण :** लातूर, **उंची :** ५.७, **रक्तगट** : बी (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** अनुराधा, **नाडी:** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** एम. टेक, **नोकरी/ व्यवसाय :** एल अँड टी मुंबई, **वार्षिक उत्पन्न :** १४ लाख, **अपेक्षा:** अनुरूप, **संपर्क :** ९५७९८०४८५३/८७८८४०४३८५

*** अंशुल प्रकाश देशकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २६/०६/१९९३, **जन्म वेळ :** सकाळी ८.०४, **जन्म ठिकाण :** नागपूर, **उंची :** ५.८, **रक्तगट** : ओ (+), **गोत्र :** अत्री, **रास :** सिंह, **नक्षत्र :** पूर्वा, **नाडी :** मध्य, **गण:** मनुष्य, **शिक्षण :** एनसीएसयू विद्यापीठ युएसए मधून एमएस कॉम्प्युटर सायन्स, **नोकरी/ व्यवसाय :** सीडीएसएल, **वार्षिक उत्पन्न :** १२ लाख ५० हजार, **अपेक्षा :** अनुरूप, सर्व्हिस करणारी, उंची ५.३ किंवा त्यापेक्षा, वयातील अंतर २/५ वर्षे, **संपर्क :** ९८९२१८०७९३

*** बिंदुमाधव पुरोहित (ऋग्वेदी कन्नड माधवा), जन्म तारीख :** १८/११/१९८५, **जन्म वेळ :** सायंकाळी ७.१०,

**जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** अत्री, **रास :** मकर, **नक्षत्र :** श्रावण, **नाडी :** अंत्य, **गण:** देव, **शिक्षण :** बीएमएम, पीजीडीएम – फायनान्स, सीएफए लेव्हल – १, **नोकरी/व्यवसाय :** मॉर्गन स्टॅन्ली येथे व्यवस्थापक, **वार्षिक उत्पन्न :** १८ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९३७२०९६६८७

*** राहुल गोपाळ मराठे (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** ०४/०५/१९८९, **जन्म वेळ :** रात्री ११.३०, **जन्म ठिकाण :** गोरेगाव (मुंबई), **उंची :** ५.४, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** कपि, **रास :** मेष, **नक्षत्र :** अश्विनी, **नाडी :** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** विमा व्यवस्थापनात पदव्युत्तर, **नोकरी/व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** २० लाख ६० हजार, **अपेक्षा :** पदवीधर, नोकरी नसली तरी चालेल, **संपर्क :** ९८१९४९१३८०/९८२१६४८०४४/९८२०८३५५१३

*** राहुल शिरीष कोटिभास्कर (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** १६/०६/१९९०, **जन्म वेळ :** रात्री १२.००, **जन्म ठिकाण :** कोल्हापूर, **उंची :** ६, **गोत्र :** वशिष्ठ, **रास :** कुंभ, **नक्षत्र :** पूर्वा भाद्रपदा, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण:** बी. कॉम, एमबीए इन मास मीडिया कम्युनिकेशन, **नोकरी/व्यवसाय :** धर्मा कॉर्नर स्टोन, अंधेरी, **वार्षिक उत्पन्न :** १३ लाख ८० हजार, **अपेक्षा :** स्मार्ट, मुंबईमध्ये नोकरी असणारी, **संपर्क :** ९८९०९०६४९९

*** अभिषेक मोहन श्रोती (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** ०८/०५/१९९२, **जन्म वेळ :** सकाळी ११.३०, **जन्म ठिकाण :** नालासोपारा, **उंची :** ५.९, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** अत्री, **रास :** मेष, **नक्षत्र :** पुष्य, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. ई, **नोकरी/व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ७ लाख ५० हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९९७०७३५६०७/८६००६०१८८१

*** निखिल माधव जोशी (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** १२/०९/१९९१, **जन्म वेळ :** रात्री ९.३२, **जन्म ठिकाण:** बदलापूर, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** अत्री, **रास :** तूळ, **नक्षत्र :** स्वाती, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण:** मास्टर ऑफ सायन्स इन कॉम्प्यूटर सायन्स, बी. ई (इनफॉर्मेशन टेक्नोलॉजी), **नोकरी/व्यवसाय :** एमेंडिंगेन बिलिंग सेंटर, **वार्षिक उत्पन्न :** ४९ लाख, **अपेक्षा :** जर्मनीला मुलासोबत शिफ्ट होण्यास तयारी, जर्मनीमध्ये नोकरी करण्यास तयारी असावी आणि गरज भासल्यास नोकरीसाठी जर्मन भाषा शिकण्याची तयारी/इच्छा असावी, **संपर्क :** ७०२१५६६९६४/९३२२७६३१६४

*** मोहित दिवाकर सोमण (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** ०४/१०/१९९२, **जन्म वेळ :** दुपारी २.४५, **जन्म ठिकाण :** नाशिक, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** शांडिल्य, **रास :** धनू, **नक्षत्र :** भरणी, **नाडी :** मध्य, **गण:** मनुष्य, **शिक्षण :** बी. कॉम, एमबीए, **नोकरी/व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ४ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क:** ९८६९५१८४८८/९९६९९८२५०७

*** अखिल अतुल सरवटे (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** २४/१२/१९९४, **जन्म वेळ :** रात्री ९.०३, **जन्म ठिकाण:** ठाणे, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** कौशिक, **रास :** सिंह, **नक्षत्र :** पूर्वा फाल्गुनी, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. ई, एमबीए मार्केटिंग, **नोकरी/व्यवसाय :** उपव्यवस्थापक (भारत सरकार उपक्रम, रेल्वे मंत्रालय) मुंबई, **वार्षिक उत्पन्न :** १३ लाख, **अपेक्षा :** ब्राह्मण शाखा, सुसंस्कृत, पदवीधर, उच्च पदवीधर, नोकरी आवश्यक, उंची ५.१ ते ५.५, **संपर्क :** ९८६९३०९२४३/९९६९७४५००६

*** नचिकेत अजयकुमार दांडेकर (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** १५/०५/१९९५, **जन्म वेळ :** सकाळी ८.४२, **जन्म ठिकाण :** पालघर, **उंची :** ५.७, **रक्तगट** : ए (+), **गोत्र :** वशिष्ठ, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** अनुराधा, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** बीबीए पर्यटन आणि प्रवास, **नोकरी/ व्यवसाय :** वडिलोपार्जित बांधकाम, **वार्षिक उत्पन्न:** १४ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ७३८७६४०४४७/९६५७३४५०२९

* **अद्वैत किरण ठाकूर (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** ०९/०३/१९९५, **जन्म वेळ :** दुपारी २.१४, **जन्म ठिकाण:** मुंबई, **उंची :** ५.६, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** वशिष्ट, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** मृग, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण:** बी.एससी., हॉटेल मॅनेजमेंट, **नोकरी :** रिलायन्स मुंबई, **वार्षिक उत्पन्न :** ६११०००, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९९६९००४६१८

**वर पाहिजे ........................................................................................**

* **अदिती दिलीप कर्डेकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०४/१२/१९८९, **जन्म वेळ :** सायंकाळी ७.२०, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.७, **गोत्र :** भारव्दाज, **रास :** कूंभ, **नक्षत्र :** धनिष्ठा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** M.Com. ICWA, CPL, MCA, **नोकरी/ व्यवसाय :** यू एस ए, **अपेक्षा :** अनुरूप, अदिती यूएसए मध्ये रहात आहे त्यामुळे फक्त यूएसए मधील मुलानी या स्थळासाठी संपर्क करावा, **संपर्क :** ९८९२२६२६५५/ ९७६९३९५६७२

* **दीपिका रमेश कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०८/०६/१९९९, **जन्म वेळ :** दुपारी ३.२१, **जन्म ठिकाण :** बदलापूर, **उंची :** ५.२, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** कौन्दीन्या, **रास :** मीन, **नक्षत्र :** उत्तराभद्रापादा, **नाडी:** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. कॅाम, स्टेनोग्राफर, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९३२४०२३८२६/ ९३२२३१०५२३

* **आकांक्षा प्रविण देवडिकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०६/०६/२००१, **जन्म वेळ :** दुपारी २.२०, **जन्म ठिकाण :** धुळे, **उंची :** ५.४, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** अत्री, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** ज्येष्ठा, **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** १२वी, VFX फिल्म एडिटींग, **नोकरी/ व्यवसाय :** करण्यास तयार आहे, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ८६३७७९३१०९/८८०५०१०८४१

* **स्वरदा शिवदत्त आठल्ये (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** २४/०८/१९९८, **जन्म वेळ :** सकाळी १०.२५, **जन्म ठिकाण :** पुणे, **उंची :** ५.५, **रक्तगट :** ओ (–), **गोत्र :** काश्यप, **रास :** कन्या, **नक्षत्र :** उत्तराफाल्गुन, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एमबीए बँकिंग आणि वित्त, **नोकरी/ व्यवसाय :** क्रेडिट मॅनेजर व्यावसायिक वाहन कर्ज आयडीएफसी बँक, **वार्षिक उत्पन्न :** ९ लाख ४४ हजार, **अपेक्षा :** सर्व्हिस करणारा, वार्षिक उत्पन्न १५ लाखांपेक्षा जास्त, कोकणस्थ ब्राह्मण नको, **संपर्क :** ९९२०४५९५७६/९३२४४८६१५८


## (घटस्फोटित / पुर्नविवाह)

**वधू पाहिजे ........................................................................................**

* **समीर कुलकर्णी (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** १०/०१/१९७०, **जन्म ठिकाण :** नाशिक, **उंची :** ५.४, **रक्तगट :** बी (+), **रास :** कूंभ, **नक्षत्र :** धनिष्ठा, **शिक्षण :** बी. ई मेकॅनिकल इंजिनीअर, इग्लंडहून नामांकित कॉलेज मधून मास्टर्स आणि पीएचडी केली आहे ए **नोकरी/ व्यवसाय :** पुण्यात अमेरिकन डछब साठी काम, **मासिक उत्पन्न:** २.५लाख, **अपेक्षा :** वय ४० ते ४९ वर्ष हवे, **संपर्क :** ९९००९८२३३३

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वत:ची राहील)**

## भावपूर्ण श्रद्धांजली




अलका केशव देशपांडे या एक भारतीय डॉक्टर आणि सामाजिक कार्यकर्त्या होत्या ज्या एड्स रुग्णांसाठी काम करण्यासाठी ओळखल्या जात होत्या . त्या ग्रँट मेडिकल कॉलेज आणि जेजे हॉस्पिटल मुंबई येथे अंतर्गत औषध विभागात प्राध्यापक होत्या आणि १९९० मध्ये त्यांनी पहिला एचआयव्ही ओपीडी (आउट पेशंट विभाग) सुरू केला. २००३-०४ ते २०११ पर्यंत त्यांनी अँटी-रेट्रोव्हायरल थेरपी (एआरटी) विभाग स्थापन केला आणि त्याचे नेतृत्व केले. या कालावधीत त्यांनी रुग्णालयातून कोणताही पगार घेतला नाही असे म्हटले जाते. २००१ मध्ये, त्यांना भारताचा चौथा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मश्री प्रदान करण्यात आला. ३० डिसेंबर २०२५ रोजी गंभीर आजाराशी झुंजल्यानंतर त्यांचे निधन झाले. भावपूर्ण श्रद्धांजली!

## विश्वाची प्रार्थना

संत ज्ञानेश्वरांचे 'पसायदान' ही अखिल मानवजातीसाठीची सार्वकालिक प्रार्थना आहे, म्हणूनच तर तब्बल साडेसातशे वर्षांनंतरही ती आज गायली जाते. भगवद्गीतेवर भाष्य करणाऱ्या 'ज्ञानेश्वरी'ची रचना पूर्ण करताना माउलींनी मागितलेले 'पसायदान' हे काही त्यांच्या समोरच्या श्रोत्यांपुरते किंवा 'ज्ञानेश्वरी'चे वाचन करणाऱ्यांसाठीपुरते मर्यादित नव्हते; ते साऱ्या विश्वासाठीचे होते. या 'पसायदानाची' महती यापूर्वीच सातासमुद्रापार गेली असली, तरी ती सध्या अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांच्यामुळे पुन्हा चर्चेत आली आहे. सरत्या वर्षात आपल्याला आवडलेल्या गीत - संगीताची यादी ओबामा जारी करतात. त्यानुसार २०२५ मधील त्यांची यादी प्रसिद्ध झाली असून, त्यात 'पसायदान' आहे. न्यूयॉर्कमध्ये जन्मलेली; परंतु मूळ भारतीय असलेली गणव्या अय्यर दोरायस्वामी या गायिकेने गायलेले 'पसायदान' आपल्या पसंतीला उतरल्याचे ओबामांनी या यादीव्दारे सांगितले आहे. राजकारणात राहूनही संवेदनशीलता जपणाऱ्या नेत्यांपैकी एक असलेले बराक ओबामा यांना 'पसायदान' भावले यात आश्चर्य काही नाही; कारण ही रचना अखिल मानवाच्या कल्याणासाठी आणि आजच्या काळालाही चपखल लागू होणारी आहे. जगभर अनेक ठिकाणी युध्द सुरू असताना, धर्म - वंश - वर्ण यांवरून रक्तरंजित संघर्ष होत असताना, गरिबांना जगणे असह्य होत असताना या सर्वांच्या उत्थानासाठी माउलींचे विचार आजही उपयुक्त ठरतात. ज्ञानेशवरांनी सर्वांसाठी विश्वात्मक देवाकडे प्रसाद मागितला आणि विश्वातील सर्व वाईटपणा दूर होऊन आदर्श समाज निर्माण होण्याचे स्वप्न पाहिले. खुद्द ज्ञानेश्वरांना त्या काळात, म्हणजे तेराव्या शतकात छळ सहन करावा लागला, प्रतिकूलतेला सामोरे जावे लागले; परंतू त्या सर्वांबद्दल अजिबात तक्रर न करता त्यांनी आपल्याला त्रास देणऱ्यांसह सर्व दुर्जनांच्या मनाचा दुष्टपणा जावा आणि ते सत्त्प्रवृत्तींच्या सहवासात यावे, अशी मागणी केली. जगातील पाप नाहीसे व्हावे, ज्यांना जे जे हवे ते ते मिळावे, अशी मागणीही ते करतात. ते सर्वांचे मंगल व्हावे, असे चिंततात, सत्ता - संपत्ती - शस्त्र या नष्ट होणाऱ्या वस्तूंपासून दूर जाऊन ईश्वरनिष्ठांची मांदियाळी वाढविण्याची प्रार्थना करतात. सज्जनांचा वावर असलेल्या चिंतामुक्त समाजाचे चित्र ते रेखाटतात. मानवाची दृष्टी किती विशाल असावी, याचे उदाहरणच माउलींनी घालून दिले आहे. 'वसुधैव कुटुम्बकम्'ची प्रचिती यातून येते, म्हणूनच त्यांचे पसायदान हे भाषा, प्रांत आणि देश ओलांडून जगभर गेले आहे. आर्थात, 'पसायदाना' चे केवळ गायन न करता, त्यानुसार वागण्याचा प्रयत्न होणेही आवश्यक आहे.


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com

*With best compliments from*

# SAMARTH
## URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.

**HEAD OFFICE:** Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum. **Ph.: 2431357, 2403968, 4202100**

**RC Nagar Branch:** Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. **Ph.: 2443161**
**Tilakwadi Branch:** Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. **Ph.: 2430357**
**Shahapur Branch:** 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Belgaum. **Ph.: 2431257**
**Khanapur Branch:** 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road, **Ph.: 6363090655**

**AKSHAY DEPOSIT SCHEME**

| | | | |
|---|---|---|---|
| 46 days to 180 days | 6.00% PA | 2 years | 9.00% PA |
| 181 days to 364 days | 6.50% PA | 3 years | 10.00% PA |
| 1 year | 8.00% PA | Senior Citizen 1% extra* | |

**NIRANTAR**

| | |
|---|---|
| 1 year | 8% PA |
| 2 years | 9% PA |
| 3 years | 10% PA |

*T&C Apply



**Adv. Ajay A. Sunalkar**
Chairman



**Rtn. Abhay V. Joshi**
Vice - Chairman

**BOARD OF DIRECTORS**


Ganapat A. Kulkarni • Vinayak G. Joshi • Pradeepkumar G. Kulkarni
Arvind S. Kulkarni • Maltesh G. Patil • Sunanda C. Altekar • Chaya N. Joshi
Anil V. Bhandari • Umesh D. Sungar • Parashuram M. Kamble • Ashok H. Pujeri
Raghavendra S. Kesnur - Secretary • Gouri S. Bidi - Gen. Manager

**A LEADING CO-OPERATIVE SOCIETY IN BELGAUM DISTRICT**

anandads

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, संभाजीनगर विद्यार्थी गुणगौरव



Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH